ePaper

## प्रणिती शिंदे यांचा प्रकाश आंबेडकरांवरील राग आजही कायम!



| वर्ष - 7 | अंक - 117 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- भारताचा गोल्डन बॉय नीरज!
- एअरपोर्टवर दिसली कियारा अडवाणी
- भारत टॉप-3 अर्थव्यवस्थेत सामील!
- दाढीवाल्याने पावडर लावली!

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 29 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# खड्डे बुजवा; अतिक्रमण हटवा!

## » जनसंवाद सभेत तक्रारी : प्रशासनाकडून कार्यवाहीची अपेक्षा

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आणि आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या आदेशानुसार प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन सर्व क्षेत्रिय कार्यालयांमध्ये करण्यात येते.**

आज पार पडलेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी सहभाग घेऊन एकूण ५२ तक्रारवजा सूचना मांडल्या. यात अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयांमध्ये अनुक्रमे ८,५, ३,५,४,१०,८ आणि ९ तक्रारवजा सूचना नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या.

अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या क्षेत्रीय कार्यालयांच्या जनसंवाद सभेचे अध्यक्षपद मुख्य समन्वय अधिकारी असलेले अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर, सहशहर अभियंता श्रीकांत सवणे, संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, अजय चारठाणकर यांनी भूषविले. तसेच यावेळी क्षेत्रीय अधिकारी उपस्थित होते. सभेचे अध्यक्ष तथा मुख्य समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांना नेमून दिलेल्या मनपा क्षेत्रीय कार्यालयात उपस्थित राहून नागरिकांना महापालिकेच्या अनुषंगाने असलेली कामे, अडचणी, तक्रारी, सूचना या सर्व बाबींची नोंद घेऊन संबधितांना या बाबतीत कार्यवाही करण्याच्या सूचना महापालिकेकडून दिल्या गेल्या आहेत.



### ... अशा आहेत नागरिकांच्या तक्रारी

**» जनसंवाद सभेत नागरिकांनी विविध तक्रारी व सूचना मांडल्या. यामध्ये रस्त्यावरील खड्डे लवकर बुजविण्यात यावेत या तक्रारीचा प्रामुख्याने समावेश होता. तसेच उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, शहर परिसरात वेळोवेळी किटकफवारणी करण्यात यावी, रस्त्यावरील अनधिकृत फळविक्रेते, हातगाड्या तसेच उभारण्यात आलेले अतिक्रमण काढावेत, डासांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी फवारणी करण्यात यावी, पाणीपुरवठा पुरेशा दाबाने करावा, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर डीपी वरील झाकणे दुरुस्त करणे, खराब झालेल्या ड्रेनेज लाईन्स दुरूस्त करण्यात याव्यात अशा तक्रारींचाही समावेश होता.**

# कर्करोग बरा होवू शकतो : डॉ. प्रतीक पाटील

## » पुणेरी येलमार स्नेह मेळावा : कर्करोगावरील मार्गदर्शन

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राककर्करोग (कॅन्सर) हा भयानक आजार आहे. मात्र, वारंवार काही तपासण्या केल्यास आणि पहिल्या दोन ते तीन स्टेजमध्ये आजार असेल तर नक्कीच तो बरा होऊ शकतो, असे कर्करोग तज्ञ डॉ. प्रतीक पाटील यांनी सांगितले.**



पुणेरी येलमार स्नेह मेळावा रविवारी मधुरा लॉन्स, पुनावळे येथे पार पडला. यावेळी कर्करोगावरील मार्गदर्शन आणि निदान या विषयावर डॉ. पाटील बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ नेते रंगनाथ येलमार, येलमार प्रतिष्ठाणचे अध्यक्ष अमोल माडगूळकर, उपाध्यक्ष भीमराव होळकर, प्रा. श्रीनिवास येलपले, पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल विभूते, विद्या कंडरे आदी मान्यवर उपस्थित होते. कर्करोग वरील प्राथमिक तपासण्या फारच माफक दरात होतात. छातीचा किंवा पाठीचा एक्सरे केला तरी काही कळू शकते. आज काल बसून काम करणाऱ्यांमध्ये कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे. याच बरोबर तंबाखूचे व्यसन असणाऱ्यांना तर नक्की होतोच. काहींना आनुवंशिक आजार आहे. यामुळे याकडे दुर्लक्ष करू नका, योग्य वेळी तपासण्या करून योग्य निदान घेतल्यास आजार पूर्ण पणे बरा होऊ शकतो असे डॉ. पाटील म्हणाले. क्रीडापटूंचा सत्कार, वधू-वर परिचय मेळावा...

### कार्यक्रम यशस्वीतेसाठी यांचे योगदान

**» कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी भाऊसाहेब कंडरे, सौरभ उलभगत, बलभीम कोळवले, सुनील पाटील, सुनील येलमार, नामदेव येलमार, सुभाष येलमार, डॉ, प्रशांत कोळवले यांनी प्रयत्न केले. सूत्रसंचालन अशोक येलमार यांनी तर आभार अमोल येलमार यांनी मानले.**

यावेळी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त अकुताई उलभगत यांचा सत्कार करण्यात आला. तसेच कुस्तीपटू पै. विलास कंडरे, सुभाष येलमार, विनय येलपले, अमोल येलमार, सूर्यन येलमार, उषा कोळवले, वामन येलमार आदींचा सन्मान करण्यात आला. तसेच यावेळी घेण्यात आलेल्या वधू वर परिचय मेळाव्यास उस्फुर्त प्रतिसाद मिळाला.

# मोदींचे विचार माझ्या बुद्धीला पटतात!

## भाजपसोबत गेल्यामुळे होणारी टीका चुकीची : पवार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**माझ्या सद्सदविवेक बुद्धीला सध्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विचार पटतात. यामुळेच मी भाजपसोबत सत्तेत सहभागी झालो, असे ठाम उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोमवारी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले. ते पुण्यात बोलत होते. अजित पवार म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासारखा 24 तास कार्यरत असणारा दुसरा कोणताही राष्ट्रीय नेता सध्या दिसत नाही.**

विकासाच्या महत्त्वाच्या गोष्टी डोळ्यापुढे ठेवून तात्काळ निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्यात आहे. त्यातूनच त्यांनी अर्थव्यवस्था बळकट करणे, रस्त्यांचे जाळे उभारणे, रेल्वे - मेट्रोची कामे जलदगतीने करणे आदी ठोस निर्णय त्यांनी घेतलेत. यामुळे देशाच्या आणि राज्याच्या विकासासाठी मी सत्तेत जाण्याचा निर्णय घेतला. अलीकडच्या काळात माझ्या सद्सदविवेक बुद्धीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विचार पटत आहेत. अजित पवार पुढे बोलताना म्हणाले की, फुले -शाहू -आंबेडकरांच्या विचारांची कास धरूनच मी सत्तेत सहभागी झालो. 2019 मध्ये सत्तेत आलेल्या महाविकास आघाडी सरकारमध्ये सर्वजण डाव्या विचारांचे नव्हते. त्यामुळे आम्ही भाजपसोबत गेल्यामुळे होणारी टीका चुकीची आहे. ज्या गोष्टीतून वाद निर्माण होईल असे विषय आघाडीत घेतले जात नाहीत.



### भुजबळ काय बोलले मी ऐकले नाही

» यावेळी त्यांनी छगन भुजबळ यांनी बीडमधील सभेत शरद पवाराविषयी केलेले वादग्रस्त विधान आपल्याला ऐकू आले नसल्याचेही स्पष्ट केले. अजित पवार म्हणाले की, मंत्री छगन भुजबळ यांनी बीड येथील सभेत शरद पवार यांच्याविषयी केलेले वादग्रस्त वक्तव्य मला ठळकपणे ऐकू आले नाही. पण त्यानंतर सोशल मीडियाच्या माध्यमातून मला ही गोष्ट समजली. या प्रकरणी माझे भुजबळ यांच्याशी बोलमे झाले नाही.राजकारणात वेगवेगळे मत प्रवाह असले तरी, आपल्या राज्याची राजकारण करण्याची व कामाची पद्धत वेगळी आहे. सध्या अनेक राजकारणी जगभरातील सर्व प्राण्यांच्या नावाचा वापर करून उपरोधिक टीका करतात.

देशाच्या आणि राज्याच्या उज्वल भवितव्यासाठी विकास कामे करत राहण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न आहे. त्यामुळेच बारामती व बीडमध्ये मला 'न भूतो, न भविष्य' अशा प्रकारे जनतेचा प्रतिसाद मिळाला आहे. यावेळी त्यांनी छगन भुजबळ यांनी बीडमधील सभेत शरद पवाराविषयी केलेले वादग्रस्त विधान आपल्याला ऐकू आले नसल्याचेही स्पष्ट केले. अजित पवार म्हणाले की, मंत्री छगन भुजबळ यांनी बीड येथील सभेत शरद पवार यांच्याविषयी केलेले वादग्रस्त वक्तव्य मला ठळकपणे ऐकू आले नाही. पण त्यानंतर सोशल मीडियाच्या माध्यमातून मला ही गोष्ट समजली. या प्रकरणी माझे भुजबळ यांच्याशी बोलमे झाले नाही.

राजकारणात वेगवेगळे मत प्रवाह असले तरी, आपल्या राज्याची राजकारण करण्याची व कामाची पद्धत वेगळी आहे. सध्या अनेक राजकारणी जगभरातील सर्व प्राण्यांच्या नावाचा वापर करून उपरोधिक टीका करतात. त्यांनी ते शब्द जपून वापरावेत. सर्व पक्षातील नेत्यांनी अशाप्रकारे एकमेकांवरील टीका थांबवली पाहिजे, असे ते म्हणाले. राज्यात पडलेल्या कमी पावसामुळे दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली याबाबत पवार म्हणाले, या प्रकरणी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक बैठक पार पडली. या संदर्भात सरकारची स्थितीवर नजर आहे.

पावसाने ओढ दिल्याने पिकांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे संबंधितांना पीक विमा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. 1 रुपयात पिक विमा याकरीता 4500 हजार कोटी रुपये राज्य शासनाने विमा कंपनीकडे भरले आहे. कृत्रिम पाऊस हा तात्पुरत्या उपाययोजनेचा भाग आहे. त्याने कोणतीही परिस्थिती बदलत नाही. दुबईत वेगळ्या प्रकारचे तंत्रज्ञान वापरले जात आहे. मला त्याची कल्पना नाही. या प्रकरणी संपूर्ण निकाल देईल असे तंत्रज्ञान मिळाल्यास सरकार त्यावर सकारात्मक विचार करेल.

# समाजातील ज्वलंत समस्यांवर प्रकाश!

## आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत 27 हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राजकारण, स्त्री भ्रूण हत्या, भ्रष्टाचार, बेरोजगारी, भौतिक विकासाची गती अशा समाजातील ज्वलंत समस्यांवर प्रकाश टाकत तरुणाईने पथनाट्य सादर केले. पथनाट्य, वादविवाद, भारुड, पोवाडा, भजन या प्रकारांत पाचशेहून अधिक महाविद्यालयीन विद्यार्थी आणि 1 हजार 200 हून अधिक विद्यार्थी वक्तृत्व स्पर्धेत सहभागी झाले होते. प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळाच्यावतीने 5 वा प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर करंडक राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेचे पुण्यात आयोजन करण्यात आले होते.**



पथनाट्यातून समाजातील ज्वलंत समस्यांवर प्रकाश टाकण्यात येत असल्याचे मत ॲड. शार्दुल जाधवर यांनी व्यक्त केले आहे.. प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळाच्यावतीने 5 वा प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर करंडक राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेचे पुण्यात आयोजन करण्यात आले होते. पुण्यातील नऱ्हे मानाजीनगर येथील संस्थेच्या संकुलात आयोजित स्पर्धेचे उद्घाटन शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनीचे अध्यक्ष आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड.शार्दुल जाधवर यांच्या हस्ते झाले.

यावेळी स्व. आमदार रमेशभाऊ वांजळे निबंधलेखन स्पर्धा व कै. उद्धवराव तुळशीराम जाधवर वक्तृत्व स्पर्धा ही 1 ली ते 12 वी च्या विद्यार्थ्यांकरिता आयोजित करण्यात आली होती. निबंध स्पर्धेत तब्बल 26 हजार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

उद्घाटनानंतर झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत विश्वगुरु छत्रपती शिवाजी महाराज, बदललेले शैक्षणिक धोरण, अभिव्यक्ती स्वातंत्र्याची ऐशी तैशी, खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे (साने गुरुजी) याविषयांवर विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर, वादविवाद स्पर्धेकरीता दिशाहिन राजकारणात युवकांना स्थान आहे की नाही? हा विषय देण्यात आला होता. त्यावर देखील विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले. ॲड.शार्दुल जाधवर म्हणाले, युवा पिढीतील सुप्त कलागुणांना वाव देण्याकरीता या स्पर्धेचे आयोजन केले जाते. सर्व स्पर्धा प्रकारांतील प्रथम विज्येत्याला 15 हजार 555 रुपये, द्वितीय क्रमांकाला 11 हजार 111 रुपये, तृतीय क्रमांकाला 7 हजार 777 रुपये व चषक आणि उत्तेजनार्थ क्रमांक पटकाविणा-या रुपये 1111 व चषक प्रदान करण्यात येणार आहे. स्पर्धेमध्ये पुण्यासह कोल्हापूर, कोकण, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ आदी शहरांतील संघांनी सहभागी घेतला होता. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवार, दि.८ सप्टेंबर रोजी होणार आहे.

### 8 सप्टेंबरला होणार पारितोषिक वितरण

» ॲड.शार्दुल जाधवर म्हणाले, युवा पिढीतील सुप्त कलागुणांना वाव देण्याकरीता या स्पर्धेचे आयोजन केले जाते. सर्व स्पर्धा प्रकारांतील प्रथम विज्येत्याला 15 हजार 555 रुपये, द्वितीय क्रमांकाला 11 हजार 111 रुपये, तृतीय क्रमांकाला 7 हजार 777 रुपये व चषक आणि उत्तेजनार्थ क्रमांक पटकाविणा-या रुपये 1111 व चषक प्रदान करण्यात येणार आहे. स्पर्धेमध्ये पुण्यासह कोल्हापूर, कोकण, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ आदी शहरांतील संघांनी सहभागी घेतला होता. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवार, दि.८ सप्टेंबर रोजी होणार आहे.

# कामगार भवनाला चालना!

## राज्याचे कामगार मंत्री सुरेश खाडे यांची सकारात्मक भूमिका

### भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या उपस्थितीत बैठक

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहराची ओळख 'कामगारनगरी' अशी आहे. त्यामुळे १९८५ पासून प्रलंबित असलेल्या कामगार भवनाच्या कामाला चालना देण्यात येईल. मोरवाडी येथे महापालिका प्रशासनाने दिलेल्या सुमारे ५ एकर भूखंडावर भव्य कामगार भवन उभारण्यात येईल, असे आश्वासन राज्याचे कामगार मंत्री सुरेश खाडे यांनी दिले.**

कामगार मंत्री सुरेश खाडे यांची उद्योगनगरी पिंपरी-चिंचवडचा दौरा केला. महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळ, संभाजीनगर येथे संबंधित विभागाचे अधिकारी व पदाधिकारी यांच्यासमवेत बैठक घेण्यात आली. यावेळी प्रदेश कार्यकारिणी सदस्य सदाशिव खाडे, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, पिंपरी विधानसभा निवडणूक प्रमुख अमित गोरखे, माजी उपमहापौर तुषार हिंगे, केशव घोळावे, माजी स्थायी समिती अध्यक्ष विलास मडिगेरी, भोसरी विधानसभा निवडणूक प्रमुख विकास डोळस, चिंचवड विधानसभेचे प्रमुख काळूराम बारणे, युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस अनुप मोरे, युवा मोर्चा सचिव तेजस्विनी कदम, माजी नगरसेवक उत्तमराव केंदळे, माजी नगरसेविका अनुराधा गोरखे, सरचिटणीस राजू दुर्गे, कामगार कल्याण मंडळाच्या माजी संचालिका भारती चव्हाण आदी उपस्थित होते. शहरातील कामगार नाके (मजुर अड्डे) आहेत. त्या ठिकाणी निवारा शेड, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा, नाश्ता, मध्यान्ह भोजन, वाचनालय, शौचालय व बसण्याची व्यवस्था केली जाणार आहे. नाक्यावरील कामगारांना प्रशिक्षण देण्यासाठी कामगार भवन, मोरवाडी येथे कौशल्य विकास केंद्र उभारले जाणार आहे. पिंपरी-चिंचवड ही सर्वात मोठी औद्योगिक नगरी असल्याने या ठिकाणी जास्तीत-जास्त कामगार निधी उपलब्ध करण्याचे धोरण राज्य सरकार अवलंबणार आहे. भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक पदाधिकारी व कामगार प्रतिनिधींच्या माध्यमातून शिष्टमंडळ तयार करण्यात येईल. मुंबई, मंत्रालय येथे कामगार मंत्र्यासोबत आगामी १० दिवसांत बैठक घेवून शहरातील सर्व प्रकारच्या कामगारांच्या प्रश्नावर समस्यांवर आर्थिक तरतुदी व उपाय योजना करण्यात येतील, असे आश्वासनही कामगार मंत्री सुरेश खाडे यांनी दिले आहे.



> कामगारांच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र व राज्य सरकारचा निधी कमी पडू दिला जाणार नाही. घरेलू कामगार, विक्रीकर कर्मचारी यांच्यासाठी महामंडळाची निर्मिती करून, त्यामध्ये निधी उपलब्ध त्यांच्या परिवारासाठी कल्याणकारी योजना राबविल्या जातील, असे आश्वासन कामगार मंत्री सुरेश खाडे यांनी दिले आहे. याबद्दल मी पिंपरी-चिंचवडमधील कामगारांच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करतो.
> **- शंकर जगताप**, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

### कामगार भवनसाठी 38 कोटींचा निधी...

**यावेळी संभाजीनगर केंद्र येथील इमारतीला दिव्यांग कामगारांसाठी उदवाहन बसवण्याबाबत कामगार मंत्र्यांनी आदेश दिला. तसेच, तेथील इतर समस्या सोडविण्यासाठी अधिकाऱ्यांना सूचना केल्या आहेत. प्रस्तावित कामगार भवनामध्ये कामगार कला केंद्र, क्रीडा अकादमी, अभ्यासिका, कामागारांशी संबधित सर्व विभाग, कामगारांच्या संघटीत, असंघटित, सेवा निवृत्त या सर्व प्रकारातील कामागारांच्या सर्व योजना त्या ठिकाणावरून कार्यानिवीत करण्यासाठी पाच एकर भूखंडामध्ये कामगार भवन उभारण्यासाठी पुढाकार घेण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, पहिल्या टप्प्यात ३८ कोटी रुपयांचा निधी कामगार मंत्री सुरेश खाडे यांनी मंजूर केला आहे.**

### मल्टिस्पेशालिटी ईएसआय हॉस्पिटल...

**मोहननगर येथील ईएसआय हॉस्पिटल येथे ३५० कोटी रुपयांचे मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल, सुसज्ज कार्डियाक ॲम्बुलन्स, डॉक्टर व वैद्यकीय कर्मचाऱ्यांसाठी वसाहत मंजूर केली आहे. या हॉस्पिटलमध्ये सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया मेंदू, हृदय किडनी उपचार सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. त्याचा नकाशा आराखडा महिनाभरात मंजूर करून लवकरच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व कामगार मंत्री यांच्या हस्ते भूमिपूजन करून जलद गतीने काम पूर्ण केले जाणार आहे, असेही कामगार मंत्र्यांनी सांगितले.**

---

# सैनिक हो तुमच्यासाठी...एक राखी जवानांसाठी!

## गायत्री इंग्लिश मीडिअम स्कूलचा उपक्रम : विद्यार्थ्यांद्वारे सैनिकांसाठी रक्षाबंधन सोहळा

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'राखी' म्हणजे केवळ रेशमी धागा नाही तर त्या धाग्यापासून त्यांना एक वेगळी शक्ती मिळत असते आणि त्यामुळे त्यांचे आत्मबल वाढते, अशा भावना स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष विनायकराव भोंगाळे यांनी व्यक्त केल्या.**



गायत्री इंग्लिश मीडियम स्कूल येथील विद्यार्थी व शिक्षिकांनी स्वतः राख्या बांधून रक्षाबंधनाचा सण साजरा केला. स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाच्या गायत्री इंग्लिश मीडियम स्कूल मोशी, येथील विद्यार्थ्यांनी 'सैनिकहो तुमच्यासाठी' हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमाला संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष विनायकराव भोंगाळे, विश्वस्थ सरिता विखे-पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. या उपक्रमासाठी गायत्री विद्यालयातील इयत्ता ५ वी ते ८ वी च्या विद्यार्थिनी व त्यांचे मार्गदर्शक शिक्षिका अस्मिता जाधव, योगिता अमराळे व विलास खरे या ठिकाणी उपस्थित होते.

दिघी येथील नाईक सुभेदार भोला मिश्रा व हवालदार आर. पी. खोसे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

व्यवस्थापकीय संचालक कविता भोंगाळे कडू-पाटील म्हणाल्या की, डोळ्यांत तेल घालून देशाचं रक्षण करणारे बहाद्दर सैनिक सणासुदीला आपल्या कुटुंबियांपासून लांब असतात. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना रुजावी आणि सैनिकांविषयी असणारा आदर त्यांना व्यक्त करता यावा, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

> सीमेवर लढणाऱ्या सैनिकांसाठी रेशीम धाग्याच्या अतिशय आकर्षक व सुबक अशा राख्या, शुभेच्छा पत्रासह वाघा बॉर्डर येथे पाठवण्यात आल्या. त्याचप्रमाणे दिघी येथील गुरुद्वारामध्ये सैनिक बांधवांना गायत्री इंग्लिश मीडियम स्कूल येथील विद्यार्थी व शिक्षिकांनी स्वतः राख्या बांधून रक्षाबंधनाचा सण साजरा केला. हा एक भावपूर्ण क्षण होता.
> **- कविता भोंगाळे कडू-पाटील**, व्यवस्थापकीय संचालक



## भूमिका

# मुंबईला बरबाद करू नका..

**कोविडच्या महासाथीतून हजारोंचे प्राण मुंबईच्या 'बीएमसी'नं ज्या प्रकारे वाचवले, त्याचं कौतुक जागतिक नाणेनिधीनंही केलं असताना आज चौकशीचा फेरा सुरू झाला- ही कारवाई पक्षपाती आहे, प्रशासनाचं पूर्ण खच्चीकरण करणारी आहे. हे राजकारण लक्षात आलेल्या लोकांची भावना 'खाल्ल्या ताटात थुंकू नका' अशीच आहे.**

मी मी म्हणणाऱ्या माणसाला, भल्या भल्या देशांना ताळ्यावर आणण्याचं काम कोविड नावाच्या विषाणूनं तीन वर्षांपूर्वी केलं. सूक्ष्मदर्शी यंत्रातूनच दिसणाऱ्या त्या विषाणूनं संपूर्ण जगाला काही महिने कुलूपबंद करून ठेवलं आणि आपण किती खुजे आहोत, याची आठवण मनुष्यजातीला पुन्हा एकवार झाली. आपल्या जिवाएवढं काहीच मोलाचं नाही, याची लख्ख जाणीवदेखील प्रत्येकाला झाली. कोविडमुळे जगभरात सुमारे ७० लाखांच्या आसपास बळी गेले. तब्बल ७५ कोटी लोकांना या विषाणूने ग्रासलं होतं. जगात असा कोणताही कोपरा शिल्लक राहिला नसेल की जिथे 'काहीही करा पण मला वाचवा, माझ्या कुटुंबाला वाचवा,' अशी आर्त हाक ऐकू आली नाही. कोविडचा कर्दनकाळ आता मागे पडला असला तरी त्याचं कवित्व मात्र कोणत्या ना कोणत्या रुपानं सुरूच आहे. कोविडचे विपरीत



परिणाम माणसांच्या शरीरावर, मनावर आणि समाजाच्या प्रत्येक घटकावर आजही आढळत आहेत. झालं गेलं ते मागं सारून, एकमेकाला सावरण्यासाठी हातभार लावण्याची गरज असताना माणसातील पाशवी प्रवृत्ती पुन्हा जागी झाली की काय, अशी शंका वाटू लागली आहे. या महासाथीत घनदाट लोकसंख्येच्या भारताकडे आणि त्यातही अरुंद वस्तीमध्ये दाटीवाटीची लोकवस्ती असलेल्या मुंबईकडे अवघ्या जगाचं लक्ष होतं. 'मुंबई सुखरूप तर भारत सुखरूप' हे समीकरण अर्थव्यवस्थेच्या पलीकडेदेखील लागू आहेच. मात्र, मोजक्या चौरस मीटरच्या घरांमध्ये कोंबून राहणाऱ्या मुंबईकरांना कोविडचे सर्व नियम पाळणं कसं शक्य होणार होतं? काय करावं, कसं करावं हे डॉक्टरांपासून, शास्त्रज्ञांपर्यंत कोणालाही उमजत नव्हतं, अशा स्थितीत मुंबईचे पालकत्व सांभाळणारी बृहन्मुंबई महानगरपालिका अर्थात 'बीएमसी' मात्र न डगमगता खंबीरपणे उभी राहिली. सुमारे दीडशे वर्षांच्या वाटचालीत अनेक संकटांचा, वादळांचा सामना करीत मुंबईचं पालकत्व सांभाळलेल्या या संस्थेनं, तिच्या असंख्य अधिकारी, कर्मचारी, कामगारांनी अक्षरशः जिवावर उदार होऊन मुंबईला कोविडच्या कराल जबड्यातून बाहेर काढलं. मुंबईलगतच्या जिल्ह्यांतूनच नव्हे तर अक्षरशः देशभरातून आलेल्या रुग्णांना याच महानगरानं जीवदान दिलं. कोविडमुळे नसेल पण कोविडमुळे निर्माण झालेल्या भयावह परिस्थितीनं ग्रासलेल्यांनादेखील अन्न दिलं, आधार दिला. ज्यांनी मदत मागितली त्या प्रत्येकाला सांभाळण्याची जबाबदारी मातृसंस्था म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेवर आली. या संस्थेनं कोणालाही ना म्हटलं नाही. या सगळ्या जबाबदाऱ्या सांभाळताना बीएमसी व बेस्टचे मिळून थोडथोडके नव्हे तर तब्बल ४२५ अधिकारी, कर्मचारी दगावले. सुमारे ११ हजार ६०० हून अधिकजण बाधित झाले. प्रत्येक नागरिक वाचावा, त्याला औषधं, बेड, ऑक्सिजन मिळावा म्हणून कोविड सेंटर, ऑक्सिजन प्लांटसह सगळी यंत्रणा रातोरात उभी करण्यात आली. 'मिळेल तिथून, मिळेल त्या दराने घ्या, तिजोरी रिती झाली तरी चालेल पण माणसं वाचली पाहिजेत,' हा दबाव महानगरपालिकेवर सगळीकडूनच होता. केंद्र सरकारच्या पथकांनीदेखील मुंबईतल्या धारावीसह सगळीकडे जातीने दौरे करून राज्य सरकारला आणि महानगरपालिकेला सक्त सूचना केल्या होत्याच. हे सगळं आठवायचं कारण म्हणजे, कोविड काळातील कामकाजावरून बीएमसीला लक्ष्य करण्याचं जे राजकारण आज खेळलं जातं आहे, ते होय. कोविड काळात 'बेसुमार खर्च' केला, 'नियम पायदळी तुडवले' आणि म्हणून 'भ्रष्टाचार केला' अशा कथित आरोपांवरून मुंबई महानगरपालिकेमागे एकापाठोपाठ यंत्रणांचा फेरा लावला जातो आहे. मुळात 'दुष्काळ आवडे सर्वांना' ही म्हण जन्माला आली ती सरकारी यंत्रणांच्या दुष्कर्मातून. त्याला कोणीही अपवाद नाही. दुष्काळ असो वा कोणतीही आपत्ती, संकट... त्यातूनही टाळूवरचं लोणी खाण्याची प्रवृत्ती कदापि स्वीकारार्ह, समर्थनीय होऊ शकत नाही.

## संपादकीय »

### बजाव पुंगी...!

***बुद्धिबळाच्या विश्वविजेतपदास गवसणी घालण्यापर्यंत पोहोलेला प्रज्ञानंद आणि त्याआधी एक दिवस 'इस्रो'च्या चांद्रयान मोहिमेचे केवळ गगनच नव्हे तर अवकाशचुंबी यश काही विचारविलसितांस जन्म देते.***

बुद्धिबळाच्या विश्वविजेतपदास गवसणी घालण्यापर्यंत पोहोलेला प्रज्ञानंद आणि त्याआधी एक दिवस 'इस्रो'च्या चंद्रयान मोहिमेचे केवळ गगनच नव्हे तर अवकाशचुंबी यश काही विचारविलसितांस जन्म देते. जागतिक महाकंपन्यांचे प्रमुख. याच्या जोडीने टी. चंद्रशेखर (टाटा समूह), राजेश गोपीनाथ (टीसीएस), एस. एन. सुब्रमण्यम (एल अँड टी), टी. व्ही. नरेंद्रन (टाटा स्टील), सी. विजयकुमार (एचसीएल), सुरेश नारायणन (नेस्ले इंडिया), सी. के. वेंकटरमन (टायटन) इत्यादी. शिवाय विश्वनाथन आनंद, पी. हरिकृष्ण, डी. गुकेश, कोनेरू हम्पी, एस. एल. नारायणन, एस. पी. सेथुरमन, कृष्णन् शशिकिरण, हरिका द्रोणवल्ली, वैशाली रमेशबाबू, सावित्री सी, सहिथी वर्षिनी आणि अर्थातच रमेशबाबू प्रज्ञानंद हे बुद्धिबळपटू! हैदराबादेतील पुलेला गोपीचंद यांच्या अकादमीत तयार झाले.

**कांद्याचे भाव वाढल्यानंतर दर नियंत्रित करण्याचा सरकारला अधिकार असेल तर भाव पडल्यानंतर शेतकऱ्याला संरक्षण देण्याची जबाबदारीही सरकारचीच आहे. कांद्याचे भाव वाढल्यानंतर दर नियंत्रित करण्याचा सरकारला अधिकार असेल तर भाव पडल्यानंतर शेतकऱ्याला संरक्षण देण्याची जबाबदारीही सरकारचीच आहे. वारंवार होणारे कांद्याच्या दरातील चढउतार थांबविण्यासाठी सरकारने कायमस्वरूपी उपाययोजना करायला हवी.**

# कशामुळे झाले कांद्याचे वांदे?

केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवर ४० टक्के निर्यातशुल्क आकारल्यामुळे महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि कर्नाटकातील कांदा उत्पादक शेतकरी आक्रमक झाले आहेत. त्यांची भूमिका रास्तच आहे. कारण, कांद्याची एकूण गरज आणि उपलब्धता याचा मेळ सरकारला कधीच घालता आलेला नाही. देशातील एकूण कांद्याची गरज १५६ लाख टनाची असताना एकूण कांद्याचे उत्पादन किती होते, कुठल्या महिन्यात किती उपलब्ध होते याचा मेळ सरकारला का घालता येत नाही? कांद्याचे उत्पादन देशामध्ये मोजक्याच जिल्ह्यांमध्ये होते. जवळपास ४० टक्के कांदा महाराष्ट्रातच पिकवला जातो. तीन हंगामामध्ये उत्पादन होणाऱ्या कांद्यावर नजर ठेवणे केंद्र सरकारला अजिबातच अवघड नाही. पण तसे होत नाही. भाव मिळत नाही म्हणून कधी कांदा रस्त्यावर फेकला जातो, तर कधी सरकार कांद्याचे दर पाडते म्हणून शेतकरी रस्त्यावर येतात. गेली अनेक वर्षे हे असेच चालू आहे. कांदा मातीमोल



दराने विकला जातो, त्यावेळी सगळेच मूग गिळून बसतात. शेतकऱ्यांचे अश्रू पुसायला त्यावेळी कोणच पुढे येत नाही. तो रस्त्यावर उतरल्यावर मग सरकारला जाग येते. मात्र त्याला अनुदान देताना सरकारचे हात आखडतात. कांदा हा नाशवंत माल आहे. कांद्याची साठवणूक करण्यासाठी शेतकऱ्यांकडे पुरेशी संसाधने उपलब्ध नसल्याने सरकारच्या भरवशावरच तो अवलंबून असतो. मात्र मायबाप सरकारकडे शेतकऱ्यांकडे बघायलाच वेळ नसतो. वास्तविक कांद्याचे दर पडू लागले होते, त्यावेळेस नाफेडकडे कांदा साठवणूक क्षमता असल्याने शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी करून साठवणूक करणे गरजेचे होते.

पण नाफेडने तसे केले नाही. कांद्याचा भाव ४०० ते ५०० रुपये क्विंटल होता, त्यावेळेस नाफेडने २००० रुपये क्विंटल दराने कांदा खरेदी करावा अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती. मात्र, नाफेडने केवळ ११०० रुपये क्विंटल दराने तीन लाख टन कांदा खरेदी केला. त्यावेळी शेतकऱ्यांकडे ६७ लाख टन कांदा उपलब्ध होता. सरकारकडून खरेदी याचा अर्थ दर सुधारण्यासाठी सरकारने बाजारात हस्तक्षेप करणे असा होतो. बाजारात हस्तक्षेप करून केवळ तीन लाख टन खरेदी केल्याने काहीच परिणाम झाला नाही. त्यातही नेहमीप्रमाणे मोठा भ्रष्टाचार झाला. बाजारात उतरून कांदा खरेदी करण्याऐवजी नाफेडने व्यापारी आणि दलालांकडून कांदा खरेदी केला. एवढेच नव्हे तर जुलै महिन्यामध्ये कांद्याचे भाव थोडेसे वाढत होते, तेव्हा नाफेडने कांदा खरेदी करणे बंद करून आपला साठा बाजारात आणून विकण्याचे जाहीर केले. केवळ या घोषणेमुळे वाढणारे कांद्याचे भाव पुन्हा खाली आले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# आम्हाला वाटते महाराष्ट्र शांत रहावा!

## फडणवीसांवरील टीकेमुळे चंद्रशेखर बावनकुळे संतप्त

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंगोली येथील सभेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर उद्धव ठाकरेंनी केलेल्या टीकेमुळे भाजप नेते संतप्त झालेले आहेत. उद्धव ठाकरेंनी मर्यादा सोडली तर भाजप आपली मर्यादा सोडेल. मुंबईत ईट का जवाब पत्थर से देऊ, मुंबईत असा उद्रेक होईल की तो आम्ही रोखू शकणार नाही, असा थेट इशाराच भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला आहे.**

आज नागपूर येथे पत्रकार परिषदेत चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, आम्हाला वाटते की महाराष्ट्र शांत रहावा. महाराष्ट्रात कोणती अनुचित घटना घडू नये. महाराष्ट्रात आमचे सरकार असल्याने कायदा सुव्यवस्था हातात घेऊ नये. पण उद्धव ठाकरेंनी मर्यादा ओलांडली तर भारतीय जनता पक्ष आपली मर्यादा सोडेल. त्यांनी भाग पाडले तर मुंबईत मात्र ईट का जवाब पत्थर से देऊ.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, मी कुणाला इशारा देऊ इच्छित नाही, पण ते लोक ज्या पद्धतीने वागत आहे, ते त्यांनी सोडावे. मुख्यमंत्रिपदाची धुरा सक्षमपणे सांभाळत इतिहासात नोंद होईल, असे काम देवेंद्र फडणवीस यांनी केले आणि महाराष्ट्रातील 13 कोटी जनतेच्या मनात जी उंची गाठली आहे, ती उंची कधीच कमी होऊ शकत नाही. उद्धव ठाकरे जन माणसातून मोठे झाले नाही तर सोन्याच्या चमच्याने बदामाचे दूध पिऊन मोठे झालेले आहेत. अडीच वर्षे सरकार चालवून देवेंद्र फडणवीसांसारखी उंची मी गाठू शकलो नाही, याची खंत उद्धव ठाकरेंना असेल. म्हणूनच ते गलिच्छ भाषेत, खालच्या स्तरावर जाऊन फडणवीसांबाबत बोलत आहेत. असे करून त्यांची उरली सुरली उंचीही ते कमी करून घेत आहेत. उद्धव ठाकरेंना उद्देशून चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, तुम्ही अशा नेतृत्वाचे जेवढे अपमान कराल ते नेतृत्व तेवढेच मोठे होत जाणार. देवेंद्र फडणवीसांनी उद्धव ठाकरेंना भावाप्रमाणे प्रेम दिले.

त्यांना हवे ते निर्णय करू दिले. मात्र सरकार गेल्याने उद्धव ठाकरे सैरभैर झाले आहेत. पुन्हा आता कधीच सत्तेत येणार नाहीत, हे उद्धव ठाकरेंना माहित आहे. त्यामुळे ते देवेंद्र फडणीस यांच्याबद्दल अशा पद्धतीने बोलत आहे. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, फडणवीसांवर अशाच खालच्या भाषेत टीका केल्यास एखाद्या वेळी एवढा मोठा उद्रेक होईल की मुंबईमध्ये त्याचे पडसाद उमटतील आणि आम्हीही ते रोखू शकणार नाहीत. त्यावेळी कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याचीही शक्यता नाकारता येणार नाही.

देवेंद्र फडणवीस जपानला उद्धव ठाकरेंप्रमाणे आराम करण्यासाठी गेले नव्हते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस सर्वज जण राज्यातील शेतकऱ्याकडे लक्ष ठेवून आहेत. येत्या 30 सप्टेंबरपर्यंत पक्ष आणि चिन्ह उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मिळणार आहे. चिन्हाचा निर्णयही त्यांच्याच बाजूने येणार आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी बीड येथील जाहीर सभेत सांगितले. त्यावर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठे वक्तव्य केले.



### उद्धव ठाकरेंना खंत असेल

» चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, मी कुणाला इशारा देऊ इच्छित नाही, पण ते लोक ज्या पद्धतीने वागत आहे, ते त्यांनी सोडावे. मुख्यमंत्रिपदाची धुरा सक्षमपणे सांभाळत इतिहासात नोंद होईल, असे काम देवेंद्र फडणवीस यांनी केले आणि महाराष्ट्रातील 13 कोटी जनतेच्या मनात जी उंची गाठली आहे, ती उंची कधीच कमी होऊ शकत नाही. उद्धव ठाकरे जन माणसातून मोठे झाले नाही तर सोन्याच्या चमच्याने बदामाचे दूध पिऊन मोठे झालेले आहेत. अडीच वर्षे सरकार चालवून देवेंद्र फडणवीसांसारखी उंची मी गाठू शकलो नाही, याची खंत उद्धव ठाकरेंना असेल. म्हणूनच ते गलिच्छ भाषेत, खालच्या स्तरावर जाऊन फडणवीसांबाबत बोलत आहेत.

# दाढीवाल्याने पावडर लावली!

## उद्धव ठाकरेंचे शिंदे गटाला प्रत्युत्तर

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिवसेना ( ठाकरे गट ) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची हिंगोलीत रविवारी ( २७ ऑगस्ट ) सभा पार पडली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लक्ष्य केलं. आपल्या दाढीवाल्याने भाजपाची पावडर लावली. भाजपात प्रवेश केला की शुद्ध होतात, असं हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांवर केला होता. याला शिवसेना ( शिंदे गट ) आमदार संजय शिरसाट यांनी प्रत्युत्तर दिलं आहे.**

संजय शिरसाट म्हणाले, "टोमणे मारण्याची ही पद्धत आहे. टाईमपास कसा होईल, हाच सभेचा अर्थ होता. बाकी काही नाही. विचारांचं किंवा कामांचे मंथन सभेत नव्हते.

ठाकरेंनी अडीच वर्षात काय केलं? हे सांगितलं नाही. दोन-तीन लोकांना टार्गेट करायचं, हाच सभेचा अर्थ आहे." 'सरकार आपल्या दारी आणि थापा मारते लय भारी' अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली होती.

याबद्दल विचारल्यावर संजय शिरसाट यांनी म्हटलं, "'शासन आपल्या दारी' सभेत पन्नास-पन्नास हजार लोक येतात. मग, सभेत थापा मारतात की लोकांची कामे होतात, हे त्यांना विचारा.

सभेला येणारी लोक येडी आहेत का? गरीबाला मिळालेल्या मदतीची उद्धव ठाकरे चेष्टा करत आहेत.

हिंगोलीतील सभेत बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, "पक्ष फोडला आणि इतर पक्षातून नेते फोडतात, माझ्या वडिलांचा फोटो वापरणार आणि ताकद म्हणणार असं कसं चालेल? मला माझ्या घराण्याचा अभिमान आहे. तुम्हाला घराणेशाही म्हणण्याचा हक्क नाही. तुम्ही माझा बाप चोरता तुम्हाला घराणेशाहीवर बोलायचा अधिकार नाही.



### काय म्हणाले होते उद्धव ठाकरे

» उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी हिंगोलीतील जाहीर सभेतून आमदार संतोष बांगर यांच्यावर घणाघाती टीका केली आहे. ज्या गद्दाराला आपण नाक समजून पूजा केली, उलट तोच आपल्यालाच डसायला लागला. तुला पुंगी वाजवली तुला दूध पाजले. मटक्याचे अड्डे चालवणाऱ्या हिंदुत्ववादी मानायचे का, उद्धटपणा येथे चालणार नाही, अशा शब्दात उद्धव ठाकरे यांनी बांगर यांचा समाचार घेतला दरम्यान उद्धव ठाकरे म्हणाले की, श्रावण महिना सुरू झाला आहे. नागपंचमी झाली. गद्दारांना साप समजून पूजायला लागलो. पायाखाली साप आला तर शेतकऱ्यांना काय करायचे हे माहीत आहे. अवैध धंदे करणारा हिंदू असेल का, असू शकतो? हिंगोलीचे गद्दार उद्धटपणा करतात, त्यांना गाडून टाका, अशी टीका उद्धव ठाकरे हिंगोलीच्या सभेतून केली आहे.

# उदयनराजेंची रामदास आठवलेंवरच कविता

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

हटके स्टाईल आणि डायलॉगबाजीमुळे आपली एक वेगळी फॅन फॉलोईंग असणाऱ्या खासदार उदयनराजे भोसले यांनी भर स्टेजवर चक्क केंद्रीय मंत्री रामदास आठवलेंवरच शीघ्र कविता सादर केली.

' आम्च्या मनात आहेत रामदासजी आठवले, म्हणूनच आम्ही त्यांना गटवले', ही कविता सादर करून उदयनराजेंनी रामदास आठवलेंसह रिपाइं गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये हशा पिकवला. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले काल रविवारी (ता. 27) आरपीआय आठवले गटाच्या कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर मेळाव्यासाठी साताऱ्यात आले होते. या मेळाव्याला खासदार उदयनराजे भोसले ही उपस्थित होते. यावेळी उदयनराजेंनी आठवलेंवर त्यांच्या स्टाईलने कविता सादर करत रामदास आठवले आणि



आरपीआयच्या कार्यकर्त्यांना खूश केले. मला कविता येत नाही, पण दिल्लीला गेल्यावर त्यांच्याकडून शिकून घेतो, अशी मिश्किल टीपण्णीही उदयनराजेंनी केली.' दरम्यान, आगामी लोकसभा निवडणुकासाठी आतापासूनच वातावरण तापायला सुरूवात झाली आहे. लोकसभा निवडणुकीसाठी सातारा मतदारसंघातून अनेकजण इच्छुक आहेत. पण, याबाबत भाजपचे खासदार उदयनराजे भोसले यांनी सावध भूमिका घेतली आहे. या विषयी पत्रकारांनी त्यांना विचारले असता ते म्हणाले, आताच सगळं उघड केलं तर कसं होणार. लोकांचा आग्रह असतो तो पण लक्षात घेतला पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

# भारत टॉप-3 अर्थव्यवस्थेत सामील होईल!

## पंतप्रधान मोदींनी 51 हजार तरुणांना जॉईनिंग लेटर

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज म्हणजेच 28 ऑगस्ट रोजी रोजगार मेळाव्याअंतर्गत 51 हजारांहून अधिक तरुणांना जॉईनिंग लेटर दिले. यावेळी पंतप्रधान मोदींनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे तरुणांना संबोधित केले. पंतप्रधान म्हणाले- भारत लवकरच टॉप-3 अर्थव्यवस्थेत सामील होईल. देशाचे रक्षक बनणे हे देशातील प्रत्येक तरुणाचे स्वप्न आहे.**

पीएम मोदी म्हणाले, 'अर्थव्यवस्थेचे चक्र हाताळणे, सुरक्षा प्रदान करणे ही तरुणांची जबाबदारी आहे. आज भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा मोबाइल फोन उत्पादक देश आहे. मोबाइल फोनची मागणी वाढली आहे. तो दिवस दूर नाही जेव्हा मोबाइल प्रमाणेच मेड इन इंडिया लॅपटॉप, टॅब्लेट, कॉम्प्युटर आणि इतर गॅजेट्स जागतिक बाजारात विकले जातील.' केंद्रीय गृह मंत्रालय, केंद्रीय राखीव पोलीस दल (CRPF), सीमा सुरक्षा दल (BSF), सशस्त्र सीमा बल (SSB), आसाम रायफल्स, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (CISF), इंडो तिबेटीयन सीमा पोलीस (ITBP) आणि अंमली पदार्थ नियंत्रण ब्युरो (NCB) सह, दिल्ली पोलिसांमध्येही भरती करण्यात आली आहे. यापूर्वी 22 जुलै रोजी सातव्या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर पीएम मोदींनी 70 हजारांहून अधिक तरुणांना जॉइनिंग लेटर दिले होते. देशातील 20 हून अधिक राज्यांमध्ये 44 ठिकाणी त्याचे आयोजन करण्यात आले होते. पीएम मोदी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे या कार्यक्रमाशी जोडले गेले. त्यांनी काँग्रेसचे नाव न घेता त्यांच्या सरकारच्या काळात झालेल्या फोन बँकिंग घोटाळ्याचा उल्लेख केला. पीएम मोदींनी नोकरी शोधणाऱ्यांना सांगितले की, 1947 च्या या दिवशी (22 जुलै) संविधान सभेने तिरंग्याच्या डिझाइनला अंतिम रूप दिले. आज तुम्हाला नोकरी मिळाली ही प्रेरणादायी गोष्ट आहे. सरकारी नोकरीत असताना तिरंग्याच्या वैभवाला बाधा पोहोचू नये यासाठी नेहमी प्रयत्न केले पाहिजेत. 22 ऑक्टोबर 2022 रोजी पंतप्रधानांनी रोजगार मेळाव्याचा पहिला टप्पा सुरू केला. तेव्हा पीएम म्हणाले होते - 2023 च्या अखेरीस देशातील तरुणांना 10 लाख सरकारी नोकऱ्या देण्याचे आमचे लक्ष्य आहे. पंतप्रधानांनी गेल्या 9 महिन्यांत 7 रोजगार मेळ्यांमध्ये 4 लाख 48 हजारांहून अधिक लोकांना सामील होण्याचे पत्र दिले आहे.

पहिला रोजगार मेळावा: पहिला रोजगार मेळावा 22 ऑक्टोबर 2022 रोजी आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये 75,000 हून अधिक लोकांना सामील होण्याचे पत्र वितरित करण्यात आले होते.

दुसरा रोजगार मेळावा: दुसरा रोजगार मेळावा 22 नोव्हेंबर 2022 रोजी आयोजित करण्यात आला होता. यामध्ये 71 हजारांहून अधिक जॉईनिंग लेटरचे वाटप करण्यात आले.

तिसरा रोजगार मेळावा: 20 जानेवारी 2023 रोजी देशात तिसरा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला. या रोजगार मेळाव्यात 71,000 हून अधिक जॉईनिंग लेटर देण्यात आले.

चौथा रोजगार मेळावा: चौथा रोजगार मेळावा 13 एप्रिल 2023 रोजी आयोजित करण्यात आला होता. त्यातही ७१ हजारांहून अधिक जणांना जॉईनिंग लेटर देण्यात आली.

पाचवा रोजगार मेळावा: 16 मे 2023 रोजी पाचव्या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये 70 हजारांहून अधिक लोकांना जॉईनिंग लेटर देण्यात आले.

सहावा रोजगार मेळावा: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 13 जून 2023 रोजी सहाव्या रोजगार मेळाव्यात 71 हजार 126 तरुणांना नियुक्ती पत्रांचे वाटप केले.

सातवा रोजगार मेळावा : यापूर्वी 22 जुलै रोजी सातव्या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर पीएम मोदींनी 70 हजारांहून अधिक तरुणांना जॉइनिंग लेटर दिले होते.



**45 ठिकाणी रोजगार मेळाव्याचे आयोजन**

» केंद्रीय गृह मंत्रालय, केंद्रीय राखीव पोलीस दल (CRPF), सीमा सुरक्षा दल (BSF), सशस्त्र सीमा बल (SSB), आसाम रायफल्स, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (CISF), इंडो तिबेटीयन सीमा पोलीस (ITBP) आणि अंमली पदार्थ नियंत्रण ब्युरो (NCB) सह, दिल्ली पोलिसांमध्येही भरती करण्यात आली आहे.

# नूहमध्ये शोभायात्रेला मिळाली परवानगी!

## नूहमध्ये दुपारी 4 पर्यंत बाहेरील लोकांना प्रवेश बंद

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विश्व हिंदू परिषद (VHP) आणि बजरंग दलाच्या आवाहनावर हरियाणातील नूह येथे आज पुन्हा ब्रजमंडल यात्रा काढण्यात येणार आहे. हरियाणा सरकार आणि नूह जिल्हा प्रशासनाने या यात्रेला परवानगी दिली नव्हती. परंतु, सोमवारी सकाळी प्रशासनाने 10-15 साधूंना जलाभिषेकासाठी नल्हारेश्वर मंदिरात जाण्याची परवानगी दिली.**

पोलिसांनी नुह बायपास ते नल्हारेश्वर मंदिरापर्यंत 3 वाहनांतून लोकांना नेले. यामध्ये सुमारे 51 लोक होते. ज्यांनी पतौडी आश्रमाचे महामंडलेश्वर स्वामी धर्मदेव आणि विश्व हिंदू परिषदेचे आलोक कुमार राय यांच्या नेतृत्वाखाली जलाभिषेक केला. यानंतर 11 जणांना मिरवणुकीसाठी परवानगी देण्यात आली आहे. ज्यांना नल्हारेश्वर मंदिरात जलाभिषेक करण्यास परवानगी देण्यात आली होती ते जल अर्पण करून फिरोजपूर झिरकाकडे रवाना झाले आहेत. मंदिराचा दीड किलोमीटरचा परिसर पूर्णपणे सील करण्यात आला आहे. बाहेरच्या लोकांशिवाय मीडियालाही पुढे जाऊ दिले जात नाही. ओळखपत्र पाहून स्थानिकांनाच प्रवेश दिला जात आहे. अयोध्येहून नूह यात्रेत सहभागी होण्यासाठी आलेले संत जगद्गुरू परमहंस आचार्य महाराज यांना प्रशासनाने गुरुग्रामच्या सोहना टोल प्लाझा येथे थांबवले. या कारवाईच्या निषेधार्थ त्यांनी प्लाझाजवळ आमरण उपोषण सुरू केले आहे. 31 जुलै रोजी ब्रजमंडल यात्रेदरम्यान हिंसाचार झाला होता. ज्यामध्ये 2 होमगार्डसह 6 जणांचा मृत्यू झाला होता. मंदिरात जाणाऱ्या सर्व ऋषी-मुनींची संपूर्ण यादी पोलिस अधिकाऱ्यांकडे आहे. 31 जुलै रोजी ब्रजमंडल यात्रेदरम्यान झालेल्या हिंसाचारानंतर संपूर्ण नूहमध्ये कलम 144 लागू करण्यात आले आहे. हरियाणा पोलिसांनी नूहमध्ये विस्तृत सुरक्षा व्यवस्था केल्याचा दावा केला आहे. संवेदनशील भागांवर ड्रोनद्वारे नजर ठेवली जात आहे. 27 ऑगस्टपासून जिल्ह्याच्या सर्व सीमा सील करण्यात आल्या आहेत. दिल्ली, राजस्थान आणि यूपीसह हरियाणाच्या सीमाही सील करण्यात आल्या आहेत.

सीमावर्ती भागात मोठ्या प्रमाणात पोलीस आणि निमलष्करी दलाचे जवान तैनात करण्यात आले असून ते येणाऱ्या-जाणाऱ्या सर्व वाहनांची तपासणी करत आहेत. त्याचबरोबर नुहची शाळा-कॉलेज, बँक आणि इतर सर्व कार्यालयेही बंद ठेवण्यात आली आहेत. आज मध्यरात्री १२ वाजेपर्यंत मोबाईल इंटरनेट आणि बल्क एसएमएस सेवांवरही सरकारने बंदी घातली आहे.

यावेळी मुस्लिम समाजही खबरदारी घेत आहे. सोमवारी यात्रा असल्याने मुस्लिम समाजातील लोकांनी घराबाहेर पडू नये, अशा घोषणा रविवारीच जिल्ह्यातील गावागावांतील मशिदींमधून देण्यात आल्या. खेड्यापाड्यांतही 4 पेक्षा जास्त लोक कोणत्याही ठिकाणी जमू नयेत. कोणीही आपल्या गावाबाहेर जाऊ नये. आजच्या ब्रजमंडल यात्रेसाठी विहिंपने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार सकाळी 11 वाजता नुह येथील नल्हाड गावात असलेल्या ऐतिहासिक नल्हारेश्वर महादेव मंदिरातून जलाभिषेकाने यात्रेला सुरुवात होणार आहे. येथून यात्रा नुह नगरमार्गे फिरोजपूर झिरका येथे पोहोचेल व नंतर सिंगर गावापर्यंत जाईल.



**आज शाळा-कॉलेज, बँक बंद**

» नूह जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये आणि इतर शैक्षणिक संस्था आज बंद राहणार आहेत. बँकाही बंद राहतील. नुहचे डीसी धीरेंद्र खरगटा यांनी सांगितले की, यात्रेमुळे खबरदारी म्हणून हे पाऊल उचलण्यात आले आहे. हरियाणा पोलिसांव्यतिरिक्त जिल्ह्याच्या सर्व सीमेवर आरएएफ आणि निमलष्करी दलाचे जवान तैनात आहेत. रविवारी सायंकाळी संपूर्ण जिल्ह्यात फ्लॅग मार्च काढण्यात आला.

# ड्रीम गर्ल-2 चे वीकेंड कलेक्शन 40 कोटी



सनी देओलच्या 'गदर-2' चित्रपटाने रिलीजच्या 17व्या दिवशी आणखी एक रेकॉर्ड बनवला आहे. रविवारी या चित्रपटाने 16.10 कोटींचा व्यवसाय केला. यासह, भारतीय बॉक्स ऑफिसवर 450 कोटींची कमाई करणारा हा सर्वात जलद चित्रपट ठरला आहे. चित्रपटाचे एकूण कलेक्शन आता 456 कोटी रुपये झाले आहे. यापूर्वी शाहरुख खानच्या 'पठाण'ने 18 दिवसांत हा पराक्रम केला होता. त्याच वेळी, 'बाहुबली-2' च्या हिंदी आवृत्तीला भारतीय बॉक्स ऑफिसवर 450 कोटींचा व्यवसाय करण्यासाठी 20 दिवस लागले. गदर-2 ने अवघ्या 17 दिवसांत 456 कोटींची कमाई केली आहे. ड्रीम गर्ल 2 रिलीज झाल्यानंतर तिसऱ्या आठवड्यात गदर-2 ची कमाई कमी होईल, असे ट्रेड ॲनालिस्टचे मत होते, परंतु तसे झाले नाही. शुक्रवारी त्याची कमाई कमी झाली असली तरी शनिवार आणि रविवारी पुन्हा कमाईचे नवे विक्रम प्रस्थापित केले. गदर-2 ने तिसऱ्या वीकेंडमध्ये 36.95 कोटी रुपयांचा व्यवसाय केला आहे, जो एक विक्रम आहे. दुसरीकडे आयुष्मान खुरानाच्या ड्रीम गर्ल-2 या चित्रपटानेही रविवारी चांगली कमाई केली. या चित्रपटाने रिलीजच्या तिसऱ्या दिवशी 16 कोटींचा व्यवसाय केला. यासह त्याचे पहिल्या वीकेंडचे कलेक्शन 40.71 कोटींवर पोहोचले आहे.

# एअरपोर्टवर दिसली किआरा अडवाणी

किआरा अडवाणी नुकतीच मुंबई विमानतळावर दिसली. यादरम्यान सोशल मीडियावर एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये ती पिवळ्या सलवार कुर्तामध्ये दिसत आहे. किआराने हा लूक मॅचिंग कोल्हापुरींसोबत जोडला आणि तिचे केस मोकळे सोडले. किमान मेकअप आणि काजलमध्ये अभिनेत्री खूपच सुंदर दिसत होती. किआराचा हा साधा आणि सोबर लूक चाहत्यांना खूप आवडला. व्हिडिओवर कमेंट करताना एका यूजरने लिहिले - मला तिचा कुर्ता खूप आवडला, ती किती सुंदर दिसते. दुसऱ्याने लिहिले - सुंदर किआरा. तिसऱ्याने लिहिले, 'माझी सर्वात आवडती अभिनेत्री. ती खूप सुंदर आहे, माझं तिच्यावर प्रेम आहे'. किआरा अडवाणी लवकरच साऊथ सुपरस्टार राम चरणसोबत आगामी तेलुगू चित्रपट गेम चेंजरमध्ये दिसणार आहे. या चित्रपटाद्वारे ती 5 वर्षांनंतर साऊथ इंडस्ट्रीत कमबॅक करत आहे. विनया विंध्य रामा हा तिचा शेवटचा तेलुगु चित्रपट होता जो 5 वर्षांपूर्वी प्रदर्शित झाला होता. या चित्रपटातही ती राम चरणच्या सोबत दिसली होती. याशिवाय किआरा हृतिक रोशन आणि ज्युनियर एनटीआर यांच्यासोबत ॲक्शन थ्रिलर चित्रपट वॉर 2 मध्ये देखील मुख्य भूमिकेत आहे. किआरा अखेरची सत्यप्रेम की कथामध्ये कार्तिक आर्यनसोबत दिसली होती.



# साधी राहणी हेच खरे भारतीयत्व



कंगना रणौतने 'इस्रो'मध्ये काम करणाऱ्या महिला वैज्ञानिकांचे कौतुक केले आहे. चांद्रयान-3 मोहिमेवर काम करणाऱ्या महिला वैज्ञानिकांच्या साधेपणाने कंगना प्रभावित झाली आहे. बिंदी, सिंदूर आणि गळ्यात मंगळसूत्र घालून या शास्त्रज्ञांनी एवढं मोठं मिशन पूर्ण केल्याचे ती म्हणाली. या महिला शास्त्रज्ञांमध्ये भारताची सभ्यता आणि संस्कृती संहिताबद्ध असल्याचे यावरून दिसून येते. या महिला वैज्ञानिक साधी राहणी आणि उच्च विचारसरणीचे प्रतीक असल्याचे कंगनाने सांगितले. या महिला वैज्ञानिकांचा फोटो इंस्टाग्रामवर शेअर करत कंगनाने लिहिले - भारतातील आघाडीच्या शास्त्रज्ञांकडे पहा, प्रत्येकीने साडी नेसली आहे, कपाळावर बिंदी-सिंदूर आहे. मंगळसूत्रही घातलं जातं. ही साधी राहणी उच्च विचारसरणीचे प्रतीक आहे. हे खरे भारतीयत्व आहे. कंगनाने सोबत राष्ट्रध्वजासह एक इमोजी देखील लावला आहे. आजची आधुनिक पिढी साडी नेसणे, बिंदी, मंगळसूत्र घालणे याला मागासलेली मानसिकता म्हणते. पाश्चिमात्य कपडे घालणाऱ्यांची विचारसरणी आधुनिक आहे, असे त्यांना वाटते, जरी तसे नाही. कपड्यांचा आणि विचाराचा काहीही संबंध नसतो हे या महिला शास्त्रज्ञांनी सिद्ध केले. या महिलांनी एक काम केले आहे ज्यासाठी असामान्य प्रतिभा आवश्यक आहे. 23 ऑगस्ट रोजी संध्याकाळी 6:04 वाजता चांद्रयान-3 च्या लँडरने चंद्रावर पहिले पाऊल ठेवले. तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की चांद्रयान-3 बनवण्यासाठी फक्त 615 कोटी रुपये खर्च झाले आहेत. लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे आदिपुरुषाचे बजेट जवळपास सारखेच होते. त्याचे बजेटही अनेक हॉलिवूड चित्रपटांपेक्षा कमी होते. हॉलीवूडमधील स्पेस जॉनर चित्रपटांचे बजेट साधारणपणे 500 कोटींपेक्षा जास्त असते.

# लॉरेन गॉटलीब उरकला साखरपुडा!



अमेरिकन डान्सर आणि लोकप्रिय अभिनेत्री लॉरेन गॉटलीब ही सोशल मीडियावर तिच्या बोल्ड लूकमुळे चर्चेत आहे. 'ABCD: ANY BODY CAN DANCE' या बॉलिवूड चित्रपटात तिने काम केले आणि आपल्या नृत्याने भारतात लोकप्रियता मिळवली. काही काळापूर्वी ती भोजपुरी सुपरस्टार पवन सिंगसोबत 'कमरिया हिला राही है' गाण्यामुळे चर्चेत आली आहे. तिने अनेक चित्रपटामध्येही आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. आता लॉरेन तिच्या चाहत्यांसोबत आनंदाची बातमी शेयर केली आहे. तिने तिच्या प्रियकर टोबियास जोन्ससोबत एंगेजमेंट केली आहे. त्याचे फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. तिच्या प्रियकरासाठी ती लिहिते की, "टोबियास, तू माझ्या स्वप्नांचा राजा आहेस! मला नेहमीच माहित होते की तेथे एक माणूस आहे जो खुप उत्साही, मजेदार आणि तितकाच प्रेमळ, दयाळू, काळजी घेणारा आणि तितकाच सहनशील आहे. या सर्व गोष्टींसोबत बरंच काही! मला लॉस एंजेलिस ते लंडन दरम्यान आलेल्या पहिल्या फोन कॉलनंतरच जाणवलं की आपण एकमेकांच्या आयुष्यात असायला हवं. त्या दीड वर्षात आम्ही प्रेम आणि आदराचा उत्तम पाया बांधला.

# भारताचा गोल्डन बॉय नीरज!




नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारताचा गोल्डन बॉय नीरज चोप्राने इतिहास रचला आहे. जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक जिंकणारा तो पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. हंगेरीची राजधानी बुडापेस्ट येथील नॅशनल ॲथलेटिक्स सेंटरमध्ये झालेल्या भालाफेक स्पर्धेत नीरजने ८८.१७ मीटर भालाफेक करून सुवर्णपदकावर नाव कोरले. अंतिम फेरीत एकूण सहा अटेम्ट होते आणि नीरजने दुसऱ्या अटेम्टमध्येच ८८.१७ मीटर लाब भालाफेकत आघाडी घेतली. त्यानंतर त्याने गुणतालिकेत ही आघाडी शेवटपर्यंत कायम राखली.**

पाकिस्तानच्या अर्शद नदीमने ८७.८२ मीटर फेक करून रौप्य पदक जिंकले. त्याचवेळी, झेक प्रजासत्ताकच्या जेकब वेडलेचने ८६.६७ मीटरची सर्वोत्तम थ्रो करून कांस्यपदक पटकावले. अंतिम फेरीत नीरजसोबत डीपी मनू आणि किशोर जेना हे दोन भारतीय खेळाडू होते. किशोरने ८४.७७ मीटरच्या सर्वोत्तम थ्रोसह पाचव्या स्थानावर तर डीपी मनूने ८४.१४ मीटरच्या सर्वोत्तम थ्रोसह सहाव्या स्थानावर समाधान मानावे लागले.

**पहिला प्रयत्न:** पहिल्या फेरीत नीरजला फार काही करता आले नाही. त्याचा पहिलाच प्रयत्न फाऊल झाला. डीपी मनूने ७८.४४ मीटर अंतरावर भालाफेक केली आणि त्यानंतर पाकिस्तानच्या अर्शद नदीमने ७४.८० मीटर भालाफेक केली.

**दुसरा प्रयत्न:** दुस-या फेरीत पुनरागमन केले आणि ८८.१७ मीटर थ्रो करून पहिले स्थान पटकावले. दुसऱ्या फेरीअखेर तो अव्वल स्थानावर आहे. किशोर जेनाने ८२.८२ मीटर अंतरावर भालाफेक केली. तो पाचव्या स्थानावर आहे. डीपी मनू ७८.४४ मीटर गुणांसह १०व्या क्रमांकावर आहे. अर्शद नदीम चौथ्या क्रमांकावर आहे. त्याने दुसऱ्या फेरीत ८२.८१ मीटर फेक केली.

**तिसरी फेरी:**
नीरजने तिसऱ्या फेरीत ८६.३२ मीटर अंतरावर भालाफेक केली. पाकिस्तानच्या अर्शद नदीमने तिसऱ्या फेरीत ८७.८२ मीटर अंतर फेकले. भारताच्या डीपी मनूने ८३.७२ मीटरवर भालाफेक केली. तीन फेऱ्यांमधील ही त्याची सर्वोत्तम कामगिरी होती. तर, किशोर जेना तिसऱ्या फेरीत अपयशी ठरले. त्याच्या थ्रोला फाऊल म्हटले गेले.

**चौथी फेरी:**
नीरजने चौथ्या फेरीत ८४.६४ मीटर फेक केली. डीपी मनूच्या थ्रोला फाऊल म्हटले गेले. किशोर जेनाने ८०.१९ मीटर फेक केली. पाकिस्तानच्या अर्शद नदीमने ८७.१५ मीटर अंतरावर भालाफेक केली. चार फेऱ्यांनंतर नीरज पहिला, अर्शद दुसरा आणि जर्मनीचा ज्युलियन वेबर तिसरा आहे. आता आणखी दोन फेऱ्या बाकी होत्या.

**पाचवी फेरी:** नीरजने पाचव्या फेरीत ८७.७३ मीटर अंतरावर भालाफेक केली. पाचव्या फेरीत किशोर जेनाच्या थ्रोला फाऊल म्हटले गेले. त्याचवेळी डीपी मनूने पाचव्या प्रयत्नात ८३.४८ मीटर भालाफेक केली.

**सहावी फेरी:** सहाव्या फेरीत नीरजने ८३.९८ मीटर फेक केला. त्याचवेळी किशोरचा सहावा प्रयत्न फाऊल झाला. डीपी मनूने ८४.१४ मीटरची थ्रो केली. अंतिम फेरीतील हा त्याचा आतापर्यंतचा सर्वोत्तम थ्रो ठरला. ६व्या प्रयत्नानंतर, नीरजने डीपी मनू आणि किशोर जेना यांना मिठी मारली आणि खूप आनंदी दिसला.

## चॅम्पियनशिप : सुवर्ण जिंकणारा पहिला भारतीय

» १९८३ पासून सुरू असलेल्या जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये प्रथमच भारतीय खेळाडूने सुवर्णपदक जिंकले आहे. एकंदरीत, जागतिक स्पर्धेत भारताचे हे तिसरे पदक आहे. गेल्या वर्षी नीरजने या चॅम्पियनशिपमध्ये रौप्य पदक जिंकले होते, तर लांब उडीपटू अंजू बॉबी जॉर्जने २० वर्षांपूर्वी २००३च्या वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक जिंकले होते. नीरज यापूर्वी २०२० मध्ये ऑलिम्पिकमध्ये ॲथलेटिक्समध्ये सुवर्णपदक जिंकणारा पहिला भारतीय ठरला होता. ऑलिम्पिकमध्ये ॲथलेटिक्समध्ये भारताला पहिले सुवर्ण जिंकणारा नीरज चोप्रा ऑलिम्पिक आणि जागतिक चॅम्पियनशिप या दोन्हींमध्ये सुवर्णपदक जिंकणारा पहिला भारतीय खेळाडू ठरला. १९०० पासून झालेल्या ऑलिम्पिकमध्ये नीरजच्या सुवर्णखेरीज भारताला ट्रॅक आणि फील्ड इव्हेंटमध्ये कोणतेही पदक मिळालेले नाही. नीरजच्या आधी, मिल्खा सिंग आणि पीटी उषा सारखे महान खेळाडू ऑलिम्पिक ट्रॅक आणि फील्ड इव्हेंटमध्ये पदक जिंकण्याच्या सर्वात जवळ आले होते, परंतु ते देखील ऑलिम्पिक पदक कमी फरकाने गमावले होते आणि चौथ्या स्थानावर होते. अखेर नीरज चोप्राने २०२०च्या ऑलिम्पिकमध्ये भालाफेकीत सुवर्ण जिंकून ऑलिम्पिकमध्ये ॲथलेटिक्समध्ये पदक न मिळवण्याचा १२० वर्षांचा दुष्काळ संपवला.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही केले अभिनंदन

» भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्राने जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक जिंकून पुन्हा एकदा देशाचे नाव उंचावले आहे. या स्पर्धेत नीरजने अंतिम फेरीत ८८.१७ मीटर भालाफेक करून सुवर्णपदक जिंकले. सुवर्णपदक जिंकणारा तो पहिला भारतीय ठरला. या ऐतिहासिक विजयानंतर देशभरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. अशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही त्याचे अभिनंदन केले. पीएम मोदींनी सोशल मीडियाच्या माध्यमातून गोल्डन बॉयचे अभिनंदन केले. त्यांनी ट्विट करताना लिहिले, “प्रतिभावान नीरज हे उत्कृष्टतेचे उदाहरण आहे. त्याचे समर्पण, अचूकता आणि उत्कटता त्याला केवळ ॲथलेटिक्समध्येच चॅम्पियन बनवत नाही, तर संपूर्ण क्रीडा जगतात अतुलनीय उत्कृष्टतेचे प्रतीक बनवते. जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक जिंकल्याबद्दल त्याचे अभिनंदन. भारतीय ॲथलेटिक्सच्या गोल्डन बॉयने जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये पुरुषांची भालाफेक स्पर्धा जिंकली. तुमच्या कामगिरीचा संपूर्ण देशाला अभिमान आहे आणि हा क्षण भारतीय क्रीडा इतिहासात नेहमीच लक्षात राहील.

# सुनील नरेनने रचला इतिहास!

## » रेड कार्ड मिळवणारा पहिला क्रिकेटपटू

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**फिरकीपटू सुनील नरेन रविवारी कॅरिबियन प्रीमियर लीग २०२३ (सीपीएल 2023) सामन्यादरम्यान रेड कार्ड मिळवणारा पहिला क्रिकेटर बनला. सीपीएलच्या संयोजकांनी स्लो ओव्हर रेटला सामोरे जाण्यासाठी लाल कार्डे आणली आहेत, हे सुनिश्चित करण्यासाठी की संघांनी त्यांच्या षटकांचा कोटा निर्धारित ८५ मिनिटांत पूर्ण केला पाहिजे.**



सीपीएलमधील स्लो ओव्हर रेटच्या नवीन नियमानुसार, जर एखाद्या संघाला निर्धारित वेळेत षटक पूर्ण करता आले नाही, तर विरोधी संघाचा कर्णधार एक खेळाडू निवडतो, जो उर्वरित षटकांसाठी मैदानाबाहेर राहतो. याशिवाय सर्कलमध्ये ६ क्षेत्ररक्षक आहेत. सुनील नरेन बाहेर पडल्यानंतर त्रिनबागो नाइट रायडर्सकडे फक्त १० खेळाडू उरले होते. मात्र, तरीही संघाने हा सामना ६ गडी राखून जिंकला. शेवटच्या षटकात मैदानाबाहेर जाण्यापूर्वी सुनील नरेनने चार षटकांचा कोटा पूर्ण केला होता.

त्रिनबागो नाइट रायडर्सचा कर्णधार किरॉन पोलार्डने पेनल्टीवर नाराजी व्यक्त केली आहे. तो म्हणाला, “खर सांगायचे तर, यामुळे आमच्या सर्व मेहनतीचा नाश करेल. आम्ही प्याद्यासारखे आहोत आणि आम्हाला जे सांगितले जाईल ते आम्ही करू. आम्ही शक्य तितक्या वेगाने खेळू. जर तुम्हाला अशा स्पर्धेत ३०-४५ सेकंदांसाठी दंड आकारला गेला तर ते पूर्णपणे हास्यास्पद आहे.

# पाकिस्तान वनडे क्रमवारीत नंबर वन

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

पाकिस्तानने तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात अफगाणिस्तानचा ५९ धावांनी पराभव केला. त्याचबरोबर तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेत ३-० असा क्लीन स्वीप केला. या मालिकेत पाकिस्तानसाठी गोलंदाज आणि फलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली. तिसरा एकदिवसीय सामना जिंकताच पाकिस्तानच्या संघाने आयसीसी क्रमवारीत मोठी मजल मारली आहे. आयसीसीच्या ताज्या क्रमवारीत पाकिस्तान संघाने पहिले स्थान काबीज केले आहे. तीन एकदिवसीय मालिकेत क्लीन स्वीप केल्यानंतर पाकिस्तान आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत नंबर-१ संघ बनला आहे. पाकिस्तानचे सध्या ११८.४८ रेटिंग गुण आहेत आणि ऑस्ट्रेलियाचे ११८ रेटिंग गुण आहेत. दशांश संख्येत पाकिस्तान संघ पुढे आहे. पाकिस्तानचे २७२५ आणि ऑस्ट्रेलियाचे २७१४ गुण आहेत. याच कारणामुळे पाकिस्तानी संघाने ऑस्ट्रेलियाला मागे टाकत क्रमवारीत पहिले स्थान मिळवले आहे. भारताचे ११३ रेटिंग पॉइंट आहेत. वनडे क्रमवारीत टीम इंडिया तिसऱ्या स्थानावर आहे.